# ऋणनिर्देश

"हातकणंगले तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राची भूमिका व कार्य : एक व्यष्टी अध्ययन (१९९५-२००३) कोल्हापूर जिल्हा" हा लघु शोध प्रबंध पूर्ण करण्यासाठी मला प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्ष रुपात ज्यांचे ज्यांचे सहकार्य लाभले त्या सर्व हितचिंतकांचे आभार मानून कृतज्ञता प्रकट करणे मी माझे परम कर्तव्य समजतो.

सदर शोधप्रबंधासाठी डॉ. लक्ष्मीनारायण तारोडी, प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे. त्यासाठी मी त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे.

या शोधप्रबंधासाठी डॉ. अशोक चौसाळकर, प्राध्यापक व विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग तसेच डॉ. के. के. कावळेकर, डॉ. वासंती रासम, सौ. भारती पाटील या सर्वांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. त्या सर्वांचा मी आभारी आहे.

जिल्हा परिषद आरोग्य विभागाचे प्रमुख डॉ. मुगडे, डॉ. शिंदे, डॉ. मोरे तसेच पंचायत समिती हातकणंगले प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. व्ही. बी. बर्गे, डॉ. आर. ए. पाटील आणि आरोग्य सहाय्यक श्री. चव्हाण, सौ. व्ही. एस. वड्ड तसेच जिल्हा परिषद व पंचायत समितीमधील सर्व विभागाचे प्रमुख यांनी आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करून दिली. त्यांच्या सहकार्याशिवाय हा शोधनिबंध पूर्ण करणे शक्य नव्हते. त्यामुळे मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. तसेच हातकणंगले तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे येथील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वर्ग यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचाही अत्यंत आभारी आहे.

माझ्या शैक्षणिक वाटचालीमध्ये ज्यांचे आशिर्वाद व मार्गदर्शन लाभले असे माझे पूज्य आई-वडील, लहान भाऊ लक्ष्मण, मोठी बहिण कमल, आमचे मामा उत्तम जाधव, त्याचबरोबर माझे चुलते शिवाजी कांबरे, मोठे बंधू सुरेश कांबरे, नेताजी कांबरे, सुधीर निर्मळे यांचे सहकार्य मला लाभले त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

तसेच माझे परममित्र आण्णासाहेब हारदारे, प्रवीण कांबळे, नामदेव गवळी, श्रीकांत पाटील यांचे वेळोवेळी सहकार्य व मार्गदर्शन मोलाचे ठरले म्हणून मी या सर्वांचा आभारी आहे.

सदरच्या शोधनिबंधाचे टंकलेखन, झेरॉक्सिंग व बायडींगचे काम अत्यंत सुबकरीतीने व तत्परतेने करून दिल्याबद्दल प्राजक्ता टायपिंग ॲण्ड झेरॉक्स सेंटर, पाचगांव, कोल्हापूरच्या सौ. सुषमा संजय पसारे यांचा मी अत्यंत आभारी आहे.

सदरचा शोधनिबंध पूर्ण करण्यासाठी ज्यांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य व प्रेरणा मिळाली त्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे.

धन्यवाद.

**श्री. पिंटू तानाजी कांबरे**
संशोधक